11-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/10/2025 11:48 PM Page 1



## निवडक



बंगळुरू :किड्स कॉन्सेप्ट्सने आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत प्रथम पारितोषिक स्वीकारताना आद्या पंकज व नाईक गावकर.

### राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत आद्या नाईक गावकर

टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १०** : दक्षिण गोव्याच्या कु.आद्या पंकज नाईक गावकर हिने राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत प्रथम पारितोषिक नुकतेच पटकावले. त्यामुळे या भागातील नागरिक व हितचिंतक यांनी तिचे कौतुक व अभिनंदन केले आहे. बंगळूरू येथे दक्षिण गोव्यातील आद्या नाईक गावकर या प्रतिभावान मुलीने बंगळुरू येथे किड्स कॉन्सेप्ट्सने आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले आहे. अपवादात्मक गणिती आणि मानसिक गणना कौशल्ये दाखवून, आद्याने देशभरातील काही हुशार तरुण सहभागींशी स्पर्धा केली. स्पर्धेतील तिची उत्कृष्ट कामगिरी, तिचे समर्पण, कठोर परिश्रम आणि मानसिक अंकगणिताची आवड दर्शवते. किड्स कॉन्सेप्ट्सद्वारे आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम, भारतातील सर्वात प्रतिष्ठित अबॅकस स्पर्धांपैकी एक आहे. जी तरुण विद्यार्थ्यांना त्यांची संख्यात्मक प्रवीणता आणि संज्ञानात्मक क्षमता प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करते. आद्याची कामगिरी केवळ तिच्या वैयक्तिक उत्कृष्टतेलाच नव्हे तर दक्षिण गोव्यातून उदयास येत असलेल्या वाढत्या प्रतिभेवरही प्रकाश टाकते. तिचे हे यश तिच्या गुरू, कुटुंबीय आणि शुभचिंतकांनी साजरे केले आहे. जे तिच्या शैक्षणिक प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखतात.

### योगेश्वरी देवीच्या वर्धापन दिनानिमित्त १५ पासून शतचंडी अनुष्ठान

टीम दैनिक हेराल्ड



**डिचोली, दि. १०** : चित्तपावन ब्राह्मण संघ गोमंतक कुळण सर्वण डिचोली श्री योगेश्वरी मंदिराचा स्थापना वर्धापन दिन सोहळा शनिवार दि. १५ रोजी ते मंगळवार दि. १८ दरम्यान असे चार दिवस विविध धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार असून या उत्सवास भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पंधरा ते अठरा दरम्यान दररोज सकाळी शतचंडी अनुष्ठान दुपारी आरती महाप्रसाद सायंकाळी आरती तीर्थप्रसाद आदी नियमित कार्यक्रम होईल. शनिवार दि. १५ रोजी संध्याकाळी ७ वाजता प्रशांत वझे आणि मित्रपरिवार आयोजित भरतनाट्यम श्रीदेवी स्तुती कलाकार धरिद्री आणि हंसिनी (भिडे भगिनी कालमंज्या कर्नाटक )
रविवार दि. १६ रोजी संध्याकाळी सात वाजता चित्तपावन ब्राह्मण संघ गोमंतक आयोजित चितपावनि भाषेतील एकांकिका स्पर्धा/ महोत्सव होणार आहे. सोमवार दि. १७ रोजी संध्याकाळी ७ वाजता श्रीदत्त क्रिएशन डिचोली आणि चित पावन ब्राह्मण संघ गोमंत निर्मित संगीत नाटक 'संत गोरा कुंभार'. मंगळवार दि. १८ रोजी सकाळी ११ वाजता पावणी १२.३० वाजता पूर्णाहुती, आरती मंत्रपुष्प तीर्थप्रसाद व महाप्रसाद होईल. संध्याकाळी ४.३० वाजता हभप उर्वी बर्वे फडके यांचे कीर्तन ६.४५ ते ७ एकांकिका स्पर्धेचे बक्षीस वितरण. ७ वाजता श्री देवी योगेश्वरी ची पालखी प्रदिक्षणा नंतर आरती नंतर प्रसाद वितरण व अल्पोपहार कार्यक्रम होतील. या उत्सवात सर्वांनी आपले कुटुंबीय आप्तेष्ट मित्रमंडळींसह कार्यक्रमाला उपस्थित राहून श्रींच्या कृपा प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चित्तपावन ब्राह्मण संघ गोमंतक च्या वतीने करण्यात आले आहे.



आगोंद : निर्गुणा देवी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त उपस्थित वांगडी.

### निर्गुणा देवी नवीन मंदिराचा वर्धापनदिन उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १०** : आगोंद, काणकोण, येथील श्री निर्गुणा देवी मंदिराचा पांचवा वर्धापनदिन विविध धार्मिक विधी पुरोहित विनायक बाक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. सोमवारी सकाळी देवीस ब्राह्मणाकडून अभिषेक, वांगडी, यजमान दाम्पत्य सेवा, होम हवन, नवचंडी, कुंकुमार्चन व संबंधित धार्मिक विधी केले गेले. त्यानंतर दुपारी आरत्या, तीर्थ-प्रसाद व महाप्रसाद वितरण करण्यात आले. सर्व महाजन व भक्तगणांनी मोठ्या संख्येने या सोहळ्यास उपस्थित राहून देवीच्या कृपा प्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाला राज्याच्या विविध भागात नोकरी धंद्या निमित्त असलेले आगोंदवासिय वैयक्तिकरित्या उपस्थित होते. श्री आगोंदेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश नाईक गावकर व अन्य समिती पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भरपूर मेहनत घेतली होती.

### डॉ. सचिन कांदोळकर यांच्या आज दोन पुस्तकांचे प्रकाशन

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : ज्येष्ठ साहित्यिक तथा समीक्षक डॉ. सचिन कांदोळकर यांच्या 'कवितेच्या कोवळ्या उन्हात' (ललित गद्य) व 'गुणसंगम : मांडवी जुवारीचा' (गोमंतकीय कविता, कवी आणि काव्यसमीक्षकांवरील आस्वादक लेख संग्रह) या दोन पुस्तकांचे प्रकाशन मंगळवार दि. ११ रोजी संध्याकाळी पाच वाजता पाटो पणजी येथील संस्कृती भवन मधील सभागृहात होणार आहे. यावेळी दैनिक नवप्रभाचे संपादक तथा साहित्यिक परेश प्रभू हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत तर ज्येष्ठ पत्रकार तथा साहित्यिक सुरेश स. नाईक व शासकीय महाविद्यालय साखळी च्या मराठी विभाग प्रमुख डॉ. स्नेहा महांबरे प्रमुख वक्ते असतील.

# रणजी ट्रॉफीमध्ये मुंबईची २९२ धावांची आघाडी

## सूर्यकुमार आणि रहाणेचे अर्धशतक : शार्दुलने ६ विकेट्स घेतल्या, सूर्याचे पुनरागमन

**कोलकाता, दि. १० :**



रणजी ट्रॉफीमध्ये क्वार्टर फायनल फेरी सुरू झाली आहे. सोमवारी, सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, मुंबईने २९२ धावांची आघाडी घेतली. खेळ थांबला तेव्हा संघाने दुसऱ्या डावात २७८/४ धावा केल्या. सूर्यकुमार यादवने ७० आणि अजिंक्य रहाणेने नाबाद ८८ धावा केल्या.

दुसऱ्या दिवसाच्या २६३/५ धावसंख्येवरून हरियाणाने आपला डाव पुन्हा सुरू केला पण त्यांचा डाव ३०१ धावांवर संपला. कर्णधार अंकित कुमारने शतक झळकावले. शार्दुल ठाकूरने ६ विकेट्स घेतल्या. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर झालेल्या पहिल्या डावात मुंबईने ३१५ धावा केल्या होत्या.

मुंबईकडून शार्दुलने शानदार गोलंदाजी केली. त्याने शेवटच्या ४ विकेट घेतल्या. त्याने १८.५ षटकांत ५८ धावा देत एकूण ६ विकेट्स घेतल्या. पहिल्या डावाच्या आधारे मुंबईला १४ धावांची आघाडी मिळाली.

दुसऱ्या डावात मुंबईची सुरुवात खराब झाली. संघाने आकाश आनंदच्या रूपात ३४ धावांवर पहिली विकेट गमावली. आयुष म्हात्रेने ३१, सिद्धेश लाडने ४३ धावा केल्या. पहिल्या डावात ९ धावा करणाऱ्या सूर्यकुमार यादवने पुनरागमन केले आणि ८ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने %० धावा केल्या. कर्णधार अजिंक्य रहाणेच्या नाबाद ८८ धावांच्या खेळीमुळे मुंबई संघाला एक मजबूत स्थान मिळाले. शिवम दुबे ३० धावांवर नाबाद आहे. हरियाणाच्या ठकरालने २ विकेट्स घेतल्या.

पुण्यात केरळ संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सोमवारी, तिसऱ्या दिवशी, केरळचा पहिला डाव २८१ धावांवर संपला. सलमान निजारने ११२ धावांची खेळी खेळली. जम्मूकडून आकिब नबीने २७ षटकांत ५३ धावा देत ६ बळी घेतले. पहिल्या डावात संघाने २८० धावा केल्या होत्या.

खेळ थांबला तेव्हा जम्मू आणि काश्मीरने त्यांच्या दुसऱ्या डावात १८०/३ धावा केल्या. संघाची आघाडी १७९ धावांपर्यंत वाढली. कर्णधार पारस डोग्रा ७३ धावांवर नाबाद परतला आणि कन्हैया वाधवान ४२ धावांवर नाबाद परतला. केरळच्या एमडी निधीशने २ विकेट्स घेतल्या आहेत.

नागपूर येथील विदर्भ क्रिकेट असोसिएशन ग्राउंडवर झालेल्या सामन्यात विदर्भाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. पहिल्या डावात संघ ३५३ धावांवर ऑलआउट झाला. करुण नायरने १२२ धावांची खेळी खेळली. तामिळनाडूचा पहिला डाव २२५ धावांवर संपुष्टात आला आणि विदर्भाला १२८ धावांची आघाडी मिळाली.

तिसऱ्या दिवसाच्या खेळाच्या शेवटी, विदर्भाने दुसऱ्या डावात १६९/५ धावा केल्या. पहिल्या डावात शतकवीर करुण नायर दुसऱ्या डावात फक्त २९ धावा करू शकला. यश राठोड ५५ धावा काढून नाबाद परतला आणि हर्ष दुबे २९ धावा काढून नाबाद परतला. तामिळनाडूकडून कर्णधार साई किशोरने २ विकेट्स घेतल्या.

राजकोटमधील निरंजन शाह स्टेडियमवर झालेल्या सामन्यात गुजरातने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. पहिल्या डावात सौराष्ट्रने २१६ धावा केल्या. चिराग जानीने ६९ धावांची खेळी केली. तर गुजरातने पहिल्या डावात ५११ धावा करून २९५ धावांची आघाडी घेतली. संघाकडून जयमीत पटेलने १०३ धावा आणि यष्टिरक्षक उर्विल पटेलने १४० धावा केल्या. सौराष्ट्रकडून चिराग जानीने ४ विकेट्स घेतल्या. तिसऱ्या दिवसाच्या खेळाच्या अखेरीस सौराष्ट्रने एकही विकेट न गमावता ३३ धावा केल्या आहेत. हार्विक देसाई १८ आणि चिराग जानी ११ धावांवर नाबाद आहेत.

# इंग्लंडचा जेकब बेथेल चॅम्पियन्स ट्रॉफीतून बाहेर

**कटक, दि. १० :**



इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू जेकब बेथेल चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडला आहे. भारताविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यादरम्यान त्याला दुखापत झाली होती. त्याच्या डाव्या हाताच्या स्नायूला दुखापत झाली. ज्यामुळे तो कटकमध्ये मालिकेतील दुसरा एकदिवसीय सामनाही खेळू शकला नाही.

इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने सामन्यापूर्वी सांगितले होते की, बेथेलला आयसीसी स्पर्धेसाठी तंदुरुस्त होणे कठीण होईल. तो म्हणाला, खरे सांगायचे तर तो चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडला आहे. मी त्याच्यासाठी निराश आहे. त्याने पहिल्या एकदिवसीय सामन्यात चांगली फलंदाजी केली, त्यामुळे दुखापतीमुळे तो बाहेर आहे हे खूप वाईट आहे.

इंग्लंडचा यष्टीरक्षक - फलंदाज जेमी स्मिथ देखील स्नायूंच्या ताणातून बरा होत आहे. त्यामुळे कटक वनडे दरम्यान संघाला सहाय्यक प्रशिक्षक मार्कस ट्रेस्कोथिक आणि पॉल कॉलिंगवूड यांना पर्यायी क्षेत्ररक्षक म्हणून नियुक्त करावे लागले. तथापि, त्याला मैदानात उतरावे लागले नाही. व्यवस्थापनाने बेथेलच्या जागी यष्टिरक्षक-फलंदाज टॉम बँटनला संघात समाविष्ट केले आहे.

इंग्लंडने अद्याप चॅम्पियन्स ट्रॉफी संघात जेकब बेथेलची जागा कोण घेईल हे जाहीर केलेले नाही. संघ १२ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्ध मालिकेतील तिसरा एकदिवसीय सामना खेळेल, त्याच दिवशी आयसीसी स्पर्धेसाठी संघात अंतिम बदल करावे लागतील. संघ २२ फेब्रुवारी रोजी आपली मोहीम सुरू करेल. त्यांचा सामना लाहोरमध्ये ऑस्ट्रेलियाशी होणार आहे.

भारताविरुद्ध नागपूर एकदिवसीय सामन्यात बेथेलने अर्धशतक झळकावले. गोलंदाजी करताना त्याने फक्त १८ धावा देऊन १ विकेटही घेतली. तथापि, संघाने सामना ४ विकेट्सने गमावला. गेल्या वर्षी न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतही त्याने चांगली कामगिरी केली. त्याने ३ अर्धशतके केली आणि त्याची सरासरी ५२ होती.

टॉम बँटन गेल्या ३ वर्षांपासून इंग्लिश संघाबाहेर आहे. त्याने २०२२ मध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला. आतापर्यंत तो संघासाठी ४ एकदिवसीय आणि १६ टी-२० सामन्यांमध्ये फक्त ४ अर्धशतके करू शकला आहे. अलिकडेच, यु-टी मध्ये झालेल्या आयएलटी २० दरम्यान, त्याने फलंदाजीने उत्कृष्ट कामगिरी केली.

२६ वर्षीय या फलंदाजाने एमआय एमिरेट्सकडून खेळताना फक्त ११ सामन्यांमध्ये ४९३ धावा केल्या. यामध्ये २ शतकांचाही समावेश होता. त्याच्या संघाने प्लेऑफमध्ये प्रवेश केला, परंतु शारजाह वॉरियर्सविरुद्ध एलिमिनेटरमध्ये पराभव पत्करावा लागला.



डिचोली : झांट्ये सभागृहाचे उद्घाटन करताना उद्योगपती सुरेश झांट्ये, प्रवीण झांट्ये. सोबत सिद्धार्थ, रोहित झांट्ये, पल्लवी साळगावकर, झांट्ये परिवार व इतर.

# झांट्ये परिवाराचे सामाजिक योगदान महत्त्वपूर्ण

टीम दैनिक हेराल्ड

**मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत : नूतनिकृत झांट्ये सभागृहाचे उद्घाटन**

**डिचोली, दि. १०** : डिचोलीतील हरिश, सुरेश व उमेश हे झांट्ये बंधू यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान अतिशय महत्त्वपूर्ण असून उद्योग, शिक्षण आरोग्य, संस्कृती कला अशा चौफेर क्षेत्रात त्यांनी डिचोली तालुक्याबरोबरच गोव्यातही मोठे योगदान दिलेले आहे.

वातानिकोलीत सुसज्ज असे सभागृह (हिराबाई झांट्ये) सभागृहामुळे लोकांची मोठी सोय होणार असून सामाजिक जाणीव लक्षात ठेवून अनेक वर्ष झांट्ये परिवार जनतेला सेवा देत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी डिचलीत केले.

डिचोली येथे गेली ४५ वर्षे कार्यरत असलेल्या हिराबाई झांट्ये सभागृहाचे नूतनीकरण करण्यात आले असून झांट्ये कुटुंबाने सुमारे ८० लाख रुपये खर्चून त्याला नवे रूप दिले आहे, त्याचे उद्घाटन उद्योगपती व समाजसेवक सुरेश झांट्ये यांच्या हस्ते करण्यात आले

या कार्यक्रमांस खास उपस्थित राहून मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शुभेच्छा दिल्या.

तसेच केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक, भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक आमदार डॉक्टर चंद्रकांत शेटये, आमदार प्रेमेंद्र शेट, नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, डिचोली लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. शेखर साळकर सर्व पदाधिकारी माजी आमदार नरेश सावळ, प्रवीण झाटये, सिद्धार्थ, रोहित झांटये, पल्लवी साळगावकर व झांटये परिवार तसेच लायन्सचे पदाधिकारी गोव्यातील विविध भागातून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावून शुभेच्छा दिल्या.

सुरेश झांट्ये यांनी झाटये सभागृह नव्या सजावटीने वातानुकूलित करताना लोकांना उत्तम दर्जाची सुविधा मिळावी हा हेतू आहे. समाजासाठी दान करणे याच्यासारखे पुण्य नाही आणि ते करण्याची संधी मला व आमच्या कुटुंबाला प्राप्त झाली त्याचे खूप समाधान आहे. यापुढेही विविध क्षेत्रात सेवा कार्य करण्यासाठी आम्ही व आमचा परिवार कटिबद्ध राहील सुरेश झांट्ये यांनी यावेळी सांगितले. यानिमित्त श्रीव सौ सिद्धार्थझाट्ये यांच्या हस्ते सत्यनारायण पूजा करण्यात आली. डॉ. शेखर साळकर यांनी स्वागत केले. सिद्धार्थ झांट्ये यांनी आभार मानले.

# वाचन म्हणजे घरबसल्या जगप्रवास!

## ज्योती कुंकळकर : मुरगाव येथे विद्यार्थी लेखकांच्या भेटीला उपक्रम

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : आजपर्यंत वाचत असताना मला जे - जे नवं आढळलं ते मी त्या -त्यावेळी

त्यांचा विचार करीत राहिले. वाचन म्हणजे घरबसल्या जगप्रवास करणे आहे. एखाद प्रवासवर्णन वाचले तर आपण देश किंवा परदेश फिरून येतो. जगाचा इतिहास, भुगोल, संस्कृती कळते. एखादं पुस्तक आपल्याला खूप आवडले की नशा चढते. मला आत्मचरित्रे फार आवडतात. आजपर्यंत दोनशे पेक्षा जास्त आत्मचरित्रे मी वाचलेली आहे. सध्या मी अमोल पालेकर यांचे आत्मचरित्र वाचत आहे. आवडता प्रकार वाचला कि प्रसन्नता वाटू लागते, असे प्रतिपादन नामवंत लेखिका आणि चित्रपट निर्माती ज्योती कुंकळकर यांनी काढले.



विद्यार्थी लेखकाचे भेटेक ह्या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांसमवेत लेखिका ज्योती कुंकळकर ,संपदा कुंकळकर , प्राध्यापक सत्यवान नायक व इतर मान्यवर

विद्यार्थी लेखकांच्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन मुरगांव एज्याकेशन सोसायटीच्या वसंत जोशी कॉलेज ऑफ आर्टस अँण्ड कॉमर्स यांच्या कोंकणी विभाग व गोवा कोंकणी अकादेमीच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले होते.

प्रा. सत्यवान नायक आणि शिक्षकां समवेत ५० विद्यार्थ्यांनी ज्योती कुंकळकर आणि संपदा कुंकळकर यांच्या माशेल - तिवरे येथील निवासस्थानी भेट देवून सत्यवान नायक यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली. त्यावेळी संपदा कुंकळकर म्हणाल्या, माणूस हा कोणत्याही क्षेत्रातला असला तरी प्रत्येकाला वाचन हे खूप महत्वाचे आहे. फक्त लेखक वा संशोधकांनीच वाचले पाहिजे असे नाही. वाचलेले ज्ञान कधीच फुकट जात नाही. त्या शिवाय करियर करताना शिस्त आणि व्यवस्थापनही खूप गरजेचे आहे.

ज्योती कुंकळकरने बालकलाकार ते आजपर्यंतचा प्रवास सांगितला. स्वागत आणि प्रास्ताविक प्रा. सत्यवान नायक यांनी केले तर सुत्रसंचालन आणि आभार श्रीमती नलीशा वेळीप यांनी केले. तर पाहुण्यांची ओळख लक्षता म्हातोंडकर यांनी केली.

# टीजेएसबी सहकारी बँकेत गोवा येथील सिटीझन क-ऑपरेटिव्ह बँक विलीन

**ठाणे, दि. १० :**

नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात देशात अग्रणी असलेल्या टीजेएसबी सहकारी बँकेत गोवा, वास्को दि गामा येथील १९८४ पासून कार्यरत असलेल्या दि सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँकेचे विलीनकरण झाले आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या पुढाकाराने विलीनकरण प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या बाबतचे प्रसिद्धी पत्रक भारतीय रिझर्व बँकेने दिनांक सात फेब्रुवारी रोजी आपल्या संकेतस्थळावर प्रसारित केले आहे. विलिनकरणाच्या सर्व नियम आणि अटींची पूर्तता करून झालेल्या प्रक्रियेप्रमाणे सोमवार दिनांक दहा फेब्रुवारी पासून सिटीझन को - ऑपरेटिव्ह बँकेच्या गोवा येथील सर्व सहा शाखा टीजेएसबी सहकारी बँकेच्या शाखा म्हणून कार्यरत होतील. या सर्व सहा शाखातून टीजेएसबीच्या सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त ग्राहक सेवा तात्काळ दिल्या जाणार आहेत. या विलीनकरणामुळे टीजेएसबी बँकेच्या एकूण शाखांची संख्या एकशे त्रेचाळीस (१४३) वरून एकशे एकूणपन्नास (१४९) इतकी झाली आहे. तर, गोव्यातील शाखांची संख्या बारा (१२) झाली आहे. टीजेएसबी सहकारी बँकेने विलीन झालेल्या सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँकेचा सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्ग सामावून घेतलेला आहे. या विलीनकरणामुळे टीजेएसबी बँकेचा गोव्यातील पाया अधिक सक्षम झाला असून, या विस्तारामुळे टीजेएसबी बँक गोवेकरांना अधिक तत्पर सेवा देईल असे टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी या विलीनकरणाबाबत म्हटले आहे. ही विलीनकरण प्रक्रिया हा सहकाराचा भाग असून यामुळे गोव्यातील सहकारी बँकिंग विस्तारेल असे टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी सांगितले. पाच राज्यात कार्यरत असलेल्या टीजेएसबी सहकारी बँकेची पारदर्शी कार्यपद्धती लक्षात घेऊन भारतीय रिझर्व बँक टीजेएसबीला प्रस्ताव देते. त्यानुसार टीजेएसबी बँक कार्यवाही पूर्ण करते. ग्राहक हित, नागरी सहकारी बँक सक्षमीकरण याला टीजेएसबी प्राधान्य देते, असे शरद गांगल म्हणाले. १९७२ स्थापनेपासून टीजेएसबी सहकारी बँकेने स्व-नियमन करून वैशिष्ट्यपूर्ण कारभार केल्याने गेल्या त्रेपन्न वर्षात एकूण तेवीस हजार कोटीं पर्यंतचा व्यवसाय केला आहे, असेही अध्यक्ष शरद गांगल यांनी नमूद केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 159 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .